# मस्तच! पहिल्याच परीक्षेत भुयारी मेट्रो झाली पास

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या देशातील पहिल्यावहिल्या भुयारी मेट्रो-३ चे काम वेगाने सुरू असून, आता तर मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने सारीपुत नगर, मरोळ येथील मेट्रो रेल्वेच्या चाचणीत घवघवीत यश संपादन केले आहे. समाजमाध्यमांवर मेट्रो रेल्वेच्या भुयारी चाचणीच्या चित्रफितीवर तर नेटीझन्सच्या अक्षरश: उड्या पडल्या असून, प्रत्यक्षात भुयारी मेट्रोतून प्रवास कधी करता येणार? असाही सवाल नेटीझन्सकडून केला जात आहे.

सुरुवात - २३ हजार कोटी रुपये

आता - ३३ हजार कोटी रुपये

₹ प्रकल्पाची किंमत

## कधी धावणार?

बीकेसी ते सीप्झ हा पहिला टप्पा जून २०२३ दरम्यान सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## कोणाला फायदा

मुंबई मेट्रो-३ प्रकल्पामुळे सुमारे १६ लाख रेल्वे प्रवाशांना वातानुकूलित डब्यातून प्रवास करणे शक्य होईल.

- एकूण चार टप्पे आहेत.
- सीएमआरएस (कमिशन ऑफ मेट्रो रेल सेफ्टी) तिसऱ्या टप्प्यात आहे.
- मेट्रोने पहिला टप्पा गाठला आहे.
- मेट्रो चाचणीचे देखील चार ते पाच टप्पे आहेत.
- प्रमाणपत्र हे नंतरच्या टप्प्यात आहे.
- सारीपुत नगर, मरोळ येथे सुरु असलेली मेट्रो रेल्वेची चाचणी प्राथमिक स्तरावर यशस्वी झाली आहे.




## प्रवासभाडे यंत्र

प्रवासी मेट्रो ट्रॅकवर जाऊ नयेत म्हणून विशेष सूचना देण्यात येईल. मेट्रो स्थानकांवर स्वयंचलित प्रवासभाडे यंत्र बसविले जाईल. यामुळे जमा होणारा निधी मानवी हस्तक्षेपापासून दूर ठेवणे शक्य होणार आहे.



## अत्याधुनिक तंत्रज्ञान

एकविसाव्या शतकातील एक अत्याधुनिक सार्वजनिक वाहतूक प्रकल्प म्हणून मुंबई मेट्रो-३ मार्गाकडे पाहिले जाते. या भुयारी प्रकल्पाची बांधणी करताना अस्तित्वात असलेल्या इमारतींचे संरक्षण होण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात येत आहे.



## दुसरी लाईफलाईन

जिथे मुंगी शिरायलासुद्धा जागा नसते अशा रेल्वेतून सुमारे ७५ लाख प्रवाशांना रोजचा प्रवास करावा लागतो. मुंबईसाठी आता रेल्वेशी समांतर अशी मेट्रो रेल्वेच्या रूपाने दुसरी लाईफलाईन आजच्या क्षणी क्रमप्राप्त ठरत आहे.